● बुधवार, दि. ३० ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ९७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यात भगवे वादळ...

### लाखोंच्या संख्येत महाविजय निर्धार रॅली; विरोधकांत भरली धडकी



# अर्जुनभाऊंनाच आमदार करणार; जनतेचा निर्धार

## राज्यात महायुतीसह आपला विजय काळ्या दगडावरची भगवी रेघ - खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघात आपल्या विजयासह राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार असून ही काळ्या दगडावरील भगवी रेघ असल्याचा ठाम विश्वास शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी केला आहे. शहरातील मामा चौक येथून मंगळवार (दि २९) रोजी म हाविजय निर्धार रॅली काढत अर्जुनराव खोतकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. महारॅलीच्या समारोप प्रसंगी खोतकर बोलत होते. यावेळी म हायुतीच्य सर्वच घटक पक्षातील नेते-पदाधिकारी-कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. महाविजय निर्धार रॅलीत लाखोंच्या संख्येने जालनेकर सहभागी झाले. त्यांच्या हातातील विविध फलके जालनेकरांचे लक्ष वेधून घेत होती. त्यातील 'कार्यक्षमता, निर्णयक्षम ता, नितीमत्ता अर्जुनभाऊंनाच आमदार करणार-जनता' या फलकांची चर्चा जालना विधानसभा मतदार संघातील कानाकोपऱ्यात वाऱ्यासारखी पसरली अर्जुनभाऊंनाच आमदार करण्याचा निर्धारच या जनतेनी केला असून ही लाखोंची संख्येने उपस्थिती सर्व काही सांगून जाते. ही उपस्थिती पाहता विरोधकांत धडकी भरली आहे. प्रसंगी लढेंगे और जितेंगे, जो असेल दमदार, तोच होईल आमदार अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

> **भाजपच्या पदाधिकारी कमल तुल्ले म्हणाल्या की, अर्जुनराव खोतकर हेच सर्व महिलांचे पाठीराखे आहेत. संकटात साथ देणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी या शहरात सर्वांनीच उभे राहण्याची खरी गरज आहे.**

श्री. खोतकर म्हणाले की, मी कोणत्याही पदावर नसताना शहरातील वार्डा वार्डात आणि ग्रामीण भागातील प्रत्येक गावात विकास कामे केली अनेक ठिकाणी सध्याही कामे सुरू आहेत. सुमारे साडेतीनशे कोटी रुपये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना मतदार संघाच्या विकास कामांसाठी दिले आहेत. महिलांसाठी तर मुख्यमंत्र्यांचे धोरण अत्यंत उदार आहे. मुलीचा जन्म होताच खात्यावर पाच हजार रुपये टाकले जातात. पंधरा वर्षाची झाल्यावर एक लाख एक रुपये जमा होतात. पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत केले आहे. महिला सक्षमीकरणाच्या लाडकी बहीण सारख्या खूप योजना महिलांसाठी सुरू केल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी एक रुपयात विमा, सौर ऊर्जा प्रकल्प, मोफत वीज, केंद्र सरकार प्रमाणे राज्याकडूनही शेतकऱ्यांना सहा हजारांची मदत दिली जाते. विविध प्रकारचे अनुदान दिले जात आहेत. माझ्या ३५ वर्षातील राजकीय कारकिर्दीत मी असा लोककल्याणकारी मुख्यमंत्री पाहिलेला नाही. त्यामुळेच विधानसभेवर भगवा फडकणार आहे. जालन्यात आपला विजय होणार आहे. ही निवडणूक म्हणजे महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची रंगीत तालीम असल्याचेही खोतकर यावेळी म्हणाले. विधानसभेनंतर येणाऱ्या महापालिका आणि जिल्हा परिषदेवरही भगवा फडकविल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

**शेरोशायरीने विकास होत नसतो**

आपला विरोधी उमेदवार आमदार हा निष्क्रिय आहे. मी आणलेल्या सर्व योजनांचे ते श्रेय घेतात. आजपर्यंत ते कधीही विकास कामावर निवडून आलेले नाहीत. फक्त माझ्याबद्दल उर्मट भाषेत बोलणे, माझी बदनामी करणे, खालच्या पातळीवर टीका करणे एवढेच त्यांचे काम आहे. टक्केवारीसम्राट, मद्यसम्राट अशी फेकाफेकी करणाऱ्या या आम दाराची ओळख आहे. शेरोशायरीने विकास होत नसतो. त्यामुळे सुज्ञ आणि समंजस जनतेने यावेळी फेकाफेकी करणाऱ्या या आमदाराला कायमचे फेकुन

**पान २ वर**





# संपादकीय पान

## स्वतंत्र भारताला समर्थ व बलवान बनविणारे व्यक्तित्त्व


भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्म दिनी त्यांना विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## श्री विनायक विद्यालयाच्या आनंद घोरपडेची उंचउडीत राज्यस्तरावर निवड

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** श्री विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चांदईएक्कोचा विद्यार्थी आनंद घोरपडे याची उंच उडी क्रीडा प्रकारात राज्यस्तरावर निवड झाली.छत्रपती संभाजीनगर क्रीडा संकुलात नुकत्याच झालेल्या विभागीय उंचउडी क्रीडाप्रकारात आनंद घोरपडे याने विभागातून दुसरा क्रमांक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेत आपले स्थान पक्के केले आहे.त्याच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री बी व्ही वाघमोडे,श्री नानासाहेब ढाकणे,श्री विवेक तळेकर,श्री शरद पवार,श्री दत्तू पवार,श्री विष्णू पवार,श्री अर्जुन ढाकणे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री एस एन जगताप सर,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आनंद घोरपडे व क्रीडा शिक्षक श्रीमती पी जे पठाण मॅडम,श्री व्ही आर पिंपळसे ,श्री डी ई ढाकणे,श्री जी बी बोंगाणे सर यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# नरकचतुर्दशी इतिहास व महत्त्व

नरकासुर राक्षसाच्या वधाप्रित्यर्थ साजरा केला जाणार्या दिवाळीतील या सणाच्या निमित्ताने पहाटे सूर्योदयापूर्वी उठून अभ्यंगस्नान केले जाते. या दिवशी ब्राह्मणांना भोजन आणि वस्त्रांचे दानही दिले जाते. या सणाचे महत्त्व आणि करण्यात येणार्या कृतींमागील शास्त्र या लेखाच्या माध्यमातून समजून घेऊया.

'श्रीमद्भागवतपुराणात अशी एक कथा आहे - पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे भौमासुर किंवा नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो फार पीडा देऊ लागला. हा दुष्ट दैत्य स्त्रियांना पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना कारागृहात कोंडून ठेवले आणि त्यांच्याशी विवाह करण्याचा बेत केला. त्यामुळे जिकडेतिकडे हाहाःकार उडाला. श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच सत्यभामेसह त्याने नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व राजकन्यांना मुक्त केले. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.' कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. चतुर्दशीच्या पहाटे नरकासुरास ठार करून त्याच्या रक्ताचा टिळा कपाळास लावून श्रीकृष्ण घरी येताच मातांनी त्याला आलिंगन दिले. स्त्रियांनी दिवे ओवाळून आनंद व्यक्त केला.

महत्त्व

आदल्या रात्री १२ वाजल्यापासूनच वातावरण दूषित लहरींनी युक्त असे बनू लागते; कारण या तिथीला ब्रह्मांडातील चंद्रनाडीचे सूर्यनाडीमध्ये स्थित्यंतर घडून येते. या स्थित्यंतराचा अपेक्षित असा लाभ पाताळातील वाईट शक्तींकडून उठवला जातो. पाताळातून प्रक्षेपित होणार्या नादयुक्त कंपन लहरी वातावरणात त्रासदायक अशा ध्वनीची निर्मिती करतात. या ध्वनीची निर्मिती लहरींतील रज-तमात्मक कणांच्या हालचालींतून उत्पन्न झालेल्या ऊर्जेतून केली जाते. या लहरी विस्फुटित लहरींशी संबंधित असतात. या लहरींतील ध्वनीकंपनांना आवर घालण्यासाठी पहाटेच्या वेळी अभ्यंगस्नान करून तुपाचे दिवे लावून दीपाची मनोभावे पूजा करतात. यामुळे दीपातून प्रक्षेपित होणार्या तेजतत्त्वात्मक लहरींच्या माध्यमातून वातावरणातील त्रासदायक लहरींतील रज-तम कणांचे विघटन केले जाते. या विघटनात्मक प्रक्रियेमुळे अनेक सूक्ष्म शक्तींच्या कोषांतील रज-तम कणही विरघळले जातात आणि वाईट शक्तींच्या भोवती असलेले संरक्षककवच नष्ट होण्यास साहाय्य होते. यालाच 'अनिष्ट शक्तींचा वातावरणात दिपाच्या साहाय्याने झालेला संहार' असे म्हणतात; म्हणून या दिवशी वाईट शक्तींचे निर्दालन करून पुढच्या शुभकार्याला दिपावलीच्या इतर दिवसांच्या माध्यमातून जिवाने आरंभ करावयाचा असतो. असुरांच्या संहाराचा दिवस, म्हणजेच एकप्रकारे नरकातील पृथ्वीवर अवतीर्ण झालेल्या वाईट लहरींच्या विघटनाचा दिवस म्हणून नरकचतुर्दशीला विशेष महत्त्व आहे.

सण साजरा करण्याची पद्धत

आकाशात तारे असतांना ब्राह्ममुहूर्तावर अभ्यंगस्नान करतात. आघाडा या वनस्पतीच्या फांदीने डोक्यापासून पायापर्यंत आणि पुन्हा डोक्यापर्यंत पाणी प्रोक्षण करतात. यासाठी मूळ असलेली आघाड्याची वनस्पती वापरतात.

यमतर्पण - अभ्यंगस्नानानंतर अपमृत्यू निवारणार्थ यमतर्पण करण्यास सांगितले आहे. हा तर्पणाचा विधी पंचांगात दिलेला असतो. त्याप्रमाणे विधी करावा. त्यानंतर आई मुलांना ओवाळते. काही जण अभ्यंगस्नानानंतर नरकासुराच्या वधाचे प्रतीक म्हणून कारीट (एक प्रकारचे कडू फळ) पायाने ठेचून उडवतात, तर काही जण त्याचा रस (रक्त) जिभेला लावतात.

कारीट ठेचणे

दुपारी ब्राह्मणभोजन घालतात आणि वस्त्रदान करतात.

प्रदोषकाळी दीपदान करतात. ज्याने प्रदोषव्रत घेतले असेल, तो प्रदोषपूजा आणि शिवपूजा करतो.

नरक चतुर्दशीच्या दिवशी करायच्या विविध कृतींमागील शास्त्र

ब्राह्मणभोजन

'नरक चतुर्दशीच्या दिवशी ब्राह्मणांना भोजन देणे, म्हणजे धर्मस्वरूप अवतरीत होऊन कार्य करण्यासाठी आल्यामुळे कृतज्ञता व्यक्त करणे. या माध्यमातून ब्रह्मांडात संचारत असलेल्या धर्मलहरींना पुष्टता प्रदान करून अवतारी कार्यासाठी, म्हणजेच पृथ्वीवर येणार्या त्रासदायक अधोगामी लहरींना नष्ट करण्यासाठी समष्टीच्या इच्छाशक्तीचा पुरवठा करून प्रत्यक्ष स्वरूपात कार्य करण्यासाठी आवाहन करणे. या माध्यमातून स्वतः धर्मकर्तव्य करून ईश्वराच्या कृपाशीर्वादात्मक लहरींना ग्रहण करता येते.

वस्त्रदान

वस्त्रदान करणे, म्हणजे देवतांच्या लहरींना भूतलावर येण्यासाठी दानाच्या स्वरूपात, म्हणजेच धर्माच्या संवर्धनतेच्या माध्यमातून पोषणता प्रदान करून कार्यस्वरूपाच्या जागृतीचे आवाहन करणे. या माध्यमातून आपल्या धनसंचयाला धर्म स्वरूपाच्या कार्यासाठी अर्पण केल्याने आपली आध्यात्मिक उन्नती होते.

प्रदोषपूजा- 'कालाय तस्मै नमः' या कालमहात्म्याचे वर्णन करून कालाच्या माध्यमातून कार्यरत होणार्या स्थिरात्मक आणि पुरुषदर्शकात्मक क्रियाशक्तीच्या एका भागाची पूजा करून त्याचे संवर्धन करणे, म्हणजेच कार्यदर्शक स्वरूपात्मकता प्रदान करणे. या माध्यमातून कालमहिमा चित्तावर बिंबवून त्याप्रमाणे आचरण करून उच्च स्तराची अवस्था प्राप्त करून धर्म आचरता येतो.

शिवपूजा- समष्टीला त्रास देणार्या अधोगामी लहरींच्या निर्दालनासाठी जागृत झालेल्या ईश्वराच्या मारक स्वरूपाच्या सगुणतेला पूजेच्या माध्यमातून कृतज्ञता व्यक्त करणे. या माध्यमातून ईश्वराच्या प्रत्येक कृतीत आपुलकी निर्माण होऊन भाववृद्धी होऊन ईश्वराशी एकरूपता गाठण्याच्या दिशेला वाटचाल होते.

**संदर्भ : सनातन-निर्मित ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

# जाफराबाद पोलिसांची धडाकेबाज कारवाई,दोन आरोपी अटक, तीन लाखाच्यावर मुद्देमाल जप्त

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद पोलिसांनी अहिल्यानगर ( अहमदनगर )व बुलढाणा जिल्ह्यातील दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून धारदार शास्त्रासह सोन्या दागिन्याचे असे तीन लाख चार हजार ऐवज हस्तगत केला. त्यांच्या या धडाकेबाज कामगिरी येणे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. आदर्श आचारसंहिता चालू असल्याने,सोमवारी जाफराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पठाडेसाहेब, पोलीस कॉन्स्टेबल गावंडे, पोलीस नाईक पठाडे, पोलीस कॉन्स्टेबल जाधव, चालक डोईफोडे हे पथक जाफराबाद ते माहोरा रोडवर नाकाबंदी करत असताना गुप्त खबऱ्याकडून माहिती मिळाल्यावर, मावऱ्याकडून जाफराबाद कडे पल्सर गाडीवर दोन गुन्हेगार पल्सर गाडीवर येत आहे, तेही भरधाव वेगाने येत असल्याचे त्यांना कळाले.

पटकन त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता ते पळून जाण्याच्या तयारीत होते, पथकाने जीव धोक्यात घालून त्यांना मधोमध अडविले, त्यांना थांबवल्यानंतर त्यांची विचारपूस केल्यावर त्यांची नावे कळाली, १) रसिकांत रजनीकांत भोसले, वय वर्ष १८, जिल्हा अहिल्यानगर,२) राज बाबुराव पवार, वय वर्ष २० राहणार बामखेडा, तालुका शिंदखेडा राजा जिल्हा बुलढाणा, त्यांच्या झडती घेतली असता खालील साहित्य सापडून आले. ७३ हजार १५० रुपयाची किमतीचे काळे म्हणी सोन्याचे मनी व सोन्याचे पेंडल असलेली पोत, ६१ हजार ६०० रुपये किमतिची सोन्याची पोत, वीस हजार रुपये किमतीची चांदीची गणेशाची मूर्ती, दोन हजार रुपये किमतीचा चांदीचा लक्ष्मीचा सिक्का, ६१ हजार रुपये किमतीचा लक्ष्मीचा फोटो असलेला, हजार रुपये किमतीचा लोखंडी खंजीर, ९० हजार रुपये किमतीची बजाज पल्सर, असा तीन लाखांच्यावर मुद्देमाल जप्त करण्यात आला. ३०९ /२०२४ कलम ४/२५, शस्त्रआधी सह,१२४,१३५, म पो का प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपी पोलीस कस्टडीत असून तपास चालू आहे.



सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अजय बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन डॉ. गणपत दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे, सपोनी वैशाली पवार, पोलीस उपनिरीक्षक पठाडे, सहाय्यक फौजदार मोरे, हेड कॉन्स्टेबल भापकर, पोलीस कॉन्स्टेबल गावंडे, पोलीस कॉन्स्टेबल महेश वैद्य, पोलीस कॉन्स्टेबल भुतेकर, पोलीस नाईक पठाडे, पोलीस कॉन्स्टेबल जाधव, चालक डोईफोडे, पोलीस कॉन्स्टेबल लक्कास, मस्के, जोशी, कवलिंगे,आधींनी ही कारवाई केली.

पान १ व ४ वरुन

## अर्जुनभाऊंनाच आमदार ...

देण्याचे ठरविले असल्याचेही श्री खोतकर यावेळी म्हणाले.

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर यांनी यावेळी सांगितले की, श्रीरामासोबत लक्ष्मण आणि कृष्णासोबत बळीराम होता म्हणूनच राक्षसांचा नायनाट झाला आणि सत्याचा विजय झाला. मला तिकडं (उबाठा) करमत नव्हतं... भाऊ आले आणि कामाला लाग म्हणाले. क्षणाचाही विचार न करता आपण सहभागी झालो. ३५ वर्षापासून शिवसेना हाच आपला परिवार आहे. अर्जुनरावांनीच या मतदारसंघात विकासकामे केलेली आहेत. पण केवळ विकासच नव्हे तर सर्वांच्या सुखदुःखात अहोरात्र धावून जाणारे भाऊच आहेत. त्यामुळे तेच आमदार होण्याची खरी आवश्यकता आहे. आपण ग्रामीण भागाची सूत्र हाती घेऊन कामाला लागणार असल्याचे अनिरुद्ध खोतकर यांनी यावेळी स्पष्ट केले. या अनुषंगाने बोलताना अर्जुनराव खोतकर यांनी आपल्या भाषणात भावासाठी भाऊ धावून आल्याने आपल्याला हत्तीचे बळ मिळाले असल्याचे म्हटले.

यावेळी ॲड. ब्रह्मानंद चव्हाण यांनी सांगितले की, एकही खासदार रिपाईचा निवडून आलेला नसतांना आमचे नेते रामदास आठवले यांना मंत्रिपद देण्यात आले. आमचा पक्ष आणि समाज अर्जुनराव खोतकर यांच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभा आहे.

वीरेंद्र धोका म्हणाले की, महायुतीचे सरकार येणार असून यावेळी भाजप शिवसेना आणि राष्ट्रवादीने उमेदवाराकडे न पाहता युतीलाच मतदान करण्याचा ठाम निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे अर्जुनरावांचा विजय निश्चित झाला आहे.

यावेळी भाऊसाहेब घुगे म्हणाले की, अठरापगड जातीला सोबत घेऊन छत्रपती शिवरायांनी अनेक गड जिंकले. अर्जुनराव खोतकर हेही अठरापगड जातीला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व आहे. त्यामुळे जालन्याचा गड आम्ही जिंकल्याशिवाय राहणार नाही.

अश्फाक म्हणाले की, जालन्यात काँग्रेस आहेच कुठे? जी आहे ती कैलास गोरंट्याल लिमिटेड कंपनी आहे. यावेळी अभिमन्यू खोतकर, दर्शना खोतकर झोल, विष्णू पाचफुले, दीपक वैद्य आदींची जोरदार भाषणे झाली. सर्वच वक्त्यांनी विजयी रॅली, विजयी सभा असा आपल्या भाषणात उल्लेख केला. यावेळी विधानसभा संपर्कप्रमुख माजी खासदार हेमंत गोडसे, ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, फिरोज लाला तांबोळी, भारतीय जनता पार्टीचे वीरेंद्र धोका, सौ कमलताई कुल्ले, बाबासाहेब इंगळे, अनिरुद्ध खोतकर, पंडितराव भुतेकर, अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ॲड. भास्कर मगरे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदा ढगे, सविताताई किवंडे, संतोष मोहिते, लहुजी शक्ती सेना युवक प्रदेशाध्यक्ष सचिन शिरसागर, गणेशराव सुपारकर, उज्वलाताई फोपलीया, असपाक पठाण युवा सेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम, गणेश मोहिते, भगवान अंभोरे, राहुल गवारे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फेक नरेटिव्हला ...

मनोगतात दिली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांच्या खात्यावर ७५०० जमा झाले असून परतून विधानसभा मतदारसंघातील १ लाख १० हजार पेक्षा अधिक महिलांचा यामध्ये समावेश आहे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण जयंत पाटील यासारख्या मातब्बर नेत्यांनी त्याचबरोबर काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या सर्व पक्षांनी या योजनेची खिल्ली उडवली आणि ही योजना बंद पडावी यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली व ही योजना बंद करावे अशी मागणी देखील केले त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतलेला असताना महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ होऊन मिळू नये यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षातील सर्वांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत त्यामुळे माता भगिनी महाविकास आघाडीला नक्कीच त्यांची जागा दाखवतील असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षांनी कितीही आदळ आपण केली तरी लाडकी बहीण योजना कदापि बंद होणार नाही प्रति महिना १५०० रुपयाप्रमाणे आतापर्यंत महिलांच्या खात्यात ७५०० रुपये जमा झालेले आहेत यासाठी राज्य सरकारने ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली असून जो जोपर्यंत भारतीय जनता पक्ष शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे सरकार सत्तेत आहे तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही अशी ग्वाही देखील यावेळी आमदार लोणीकरांनी दिले.

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की मागील पंचवार्षिक मध्ये सुधीर मुनगंटीवार साहेब अर्थमंत्री असताना त्यांनी ४७०० कोटी रुपयांचा भरगोस निधी परतुर विधानसभा मतदारसंघासाठी दिला होता त्यामुळे परतुर विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी मला प्रयत्न करता आले यापुढे देखील परतुर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार असून ज्येष्ठ नागरिक महिला माता भगिनी व युवा बांधवांसाठी सातत्याने काम करण्याचा प्रयत्न करणार आहे परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही यासह परतुर विधानसभा मतदारसंघाचा परभणी जिल्ह्याची असणारा संपर्क लक्षात घेता केंद्रीय वाहतूक मंत्री श्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करून ३५५ कोटी रुपये किंमत असलेल्या परतूर - वरफळ - चिंचोली - सातोना - सेलू - मानवत रोड रस्त्याच्या कामाला देखील मंजुरी मिळाली असल्याचे लोणीकरांनी यावेळी स्पष्ट केले

यावेळी भाजप प्रदेश सचिव राहुल लोणीकर डॉक्टर ओमप्रकाश शेटे बाळासाहेब जाधव प्रवीण सातोणकर भगवान कांबळे विठ्ठलराव बरकुले यांनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी मंदाताई लोणीकर विश्वजीत खरात, अंकुशआबा बोराडे, बाबुराव शहाने, संदीप गोरे, गणेशराव खवणे, सतीशराव निर्वळ, शत्रगुण कणसे, रमेश भापकर पंजाबराव बोराडे, नागेशराव घारे नाथराव काकडे राजेश मोरे, दिपक बोराडे, नरसिंग राठोड, बी डी पवार, प्रवीण सातोनकर, हरीराम माने, रमेश भापकर माणिकराव वाघमारे गीताराम हजारे, दिनेश होलानी, माऊली शेजुळ जिजाबाई जाधव नागेशराव घारे विक्रम उफाड गजानन उफाड जिजाबाई जाधव विकास पालवे रवी सोळंके संपत टकले संभाजी वारे खय्युम पठाण गजानन देशमुख दारासिंग चव्हाण रंगनाथ येवले बंकटराव सोळंके बाबाराव थोरात प्रसादराव गडदे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विठ्ठलराव बरकुले गणेशराव घारे शिवसेना शिंदे गटाचे भगवानराव सुरुंग सुदामराव प्रधान शहाजी राक्षे श्रीष्टीचे सरपंच अर्जुन राठोड, तौफिक कुरेशी मुस्तफा पठाण मोहम्मद जमीनदार अजीम पटेल डॉ रियाज रयत क्रांती संघटनेचे गजानन राजबिंडे मधुकर मोरे भगवान कांबळे सर्जेराव जाधव अंकुशराव बोबडे कैलासराव शेळके विलास घोडके भागवत मानवतकर मुस्तफा पठाण प्रियंका खडके जयश्री पवार यमुना दवणे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सहदेव मोरे पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. सुनील शिवनगिरीकर यांनी केले.

## आचार संहिता कालावधीत ...

आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

निवडणूकीत भरारी पथके, स्थिर पथकांकडून जप्त केलेल्या रक्कमेचा कोणत्याही उमेदवाराशी किंवा राजकीय पक्षाशी किंवा कोणत्याही निवडणूक प्रचार, इत्यादीशी संबंध नाही, असे दिसून आल्यास समिती अशी रोख रक्कम ज्यांच्याकडून जप्त करण्यात आली होती. अशा व्यक्तींना देण्याबाबतचे वस्तुनिष्ठ मौखिक आदेश दिल्यानंतर अशी रक्कम तात्काळ परत करण्याची उपाययोजना करील. समिती सर्व प्रकरणांचा विचार करील व जप्तीबाबत निर्णय घेईल. जप्त केलेली व परत देण्यात येणारी रोख रक्कम १० लाखापेक्षा अधिक असल्यास ती रक्कम देण्यात येण्यापुर्वी आयकर विभागाच्या मध्यस्थ अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येईल. कोणताही प्रथम माहिती अहवाल, तक्रार दाखल केली असल्याखेरीज मतदानाच्या दिनांकानंतर ७ दिवसापेक्षा अधिक दिवसासाठी कोषागारांत प्रलंबित ठेवता येणार नाही. अशी सर्व प्रकरणे अपील समितीसमोर ठेवण्याची आणि अपील समितीच्या आदेशानुसार रोख रक्कम, मौल्यवान वस्तू परत करण्याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असेल. असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी खर्च, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# विधानसभा मतदार संघासाठी १४९ उमेदवारांचे २०८ अर्ज दाखल

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज १४९ उमेदवारांनी २०८ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आजपर्यंत एकुण २५८ उमेदवारांचे ३८२ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

९९-परतूर विधानसभा मतदार संघासाठी २३ उमेदवारांनी ३३ नाम निर्देशन अर्ज दाखल केले यात बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर)

यांचा समावेश आहे. १००-घनसावंगी मतदारसंघासाठी ३२ उमेदवारांनी ४४ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात दिनकर बाबूराव जायभाये, हिकमत बळीराम उढान, राजेश अंकुशराव टोपे यांचा समावेश आहे. १०१-जालना विधानसभा मतदार संघासाठी ३० उमेदवारांनी ३५ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात अर्जुनराव पंडितराव खोतकर (शिवसेना), कैलास किसनराव गोरंट्याल (विधानसभा सदस्य)

यांचा समावेश आहे. १०२- बदनापूर विधानसभा मतदारसंघासाठी २९ उमेदवारांनी ४३ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात चौधरी दुर्गा सुनिल (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), चौधरी रुपकुमार नेहरूलाल (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), भारत गणेश रगडे (बहुजन समाज पार्टी), संतोष वसंतलाल सांबरे (शिवसेना-उबाठा ), राहुल जगन्नाथ बागुल (राष्ट्रीय समाज पक्ष) यांचा समावेश आहे. १०३-भोकरदन विधानसभा मतदार संघासाठी ३५ उमेदवारांनी ५३ नाम निर्देशन अर्ज दाखल केले यात संतोष रावसाहेब दानवे (भारतीय जनता पार्टी) यांचा समावेश आहे. याप्रमाणे आज एकुण २०८ नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन काम काजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करण्याची अंतिम तारीख देण्यात आली होती. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

## रवी राऊत यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील राजकीय सामाजिक चळवळीतील चेहरा म्हणून ओळख असलेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रवी राऊत यांनी मंगळवार (दि २९) रोजी जालना विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

गेली अनेक वर्षांपासून ते सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. २०१४ मध्ये रवी भैया राऊत यांच्या उमेदवारीमुळे अनेकांना घाम फुटला होता त्यानंतर तब्बल दहा वर्षा जनतेत राहून समाजकार्याच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये आपला स्थान निर्माण करून मोठ्या तयारीने या निवडणुकीत पुन्हा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे मराठा आंदोलनाचे केंद्रबिंदू असलेले मनोज जरांगे पाटील यांचा त्यांना पाठिंबा मिळण्याची शक्यता असल्याने ही निवडणूक रंगतदार होणार आहे.

# जनतेने सतर्क व जागरुक व्हावे

### टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्यावतीने दिवाळीनिमित्त आवाहन

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** पोलीस ठाणे टेंभुर्णी हद्दीमध्ये दिवाळी सण उत्सव काळात चैन स्नॅचिंग (सोनसाखळी चोरी) मोटर सायकल चोरी, घरफोडी, बॅग लिफ्टिंग, मोबाईल चोरी, फसवणूक तसेच आक्षेपार्ह मजकूराचा वापर सोशल मीडियावर करणे, नको त्या अफवा पसरविणे, अशा गुन्हयांना प्रतिबंध व्हावा तसेच जनतेने सतर्क व जागरुक व्हावे या करीता पोलीस ठाणे टेंभुर्णी ता जाफ्राबाद जि जालना तर्फे आवाहन करण्यात येत आहे.



घरामध्ये मोजकीच रोख रक्कम ठेवावी. सोने-चांदीचे दागीने सुरक्षिततेसाठी बँक लॉकरचा वापर करावा.

बाहेरगावी जाताना आपले घराचे खिडक्या दरवाजे व्यवस्थित बंद करावेत. आपण बाहेरगावी जात असल्याबाबत आपले शेजारी तसेच संबधीत पोलीस स्टेशन येथे माहिती द्यावी जेणेकरून सदर परिसरामध्ये गस्त वाढविता येईल.

महिलांनी दिवाळी सण उत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी बाजारपेठेत वावरतांना आपल्या मौल्यवान वस्तू (दाग दागिने, पर्स,मोबाईल) कशा सुरक्षित राहतील यावर भर दयावा, दक्ष राहावे. महिलांनी बाजारात व ईतर ठिकाणी घराबाहेर जातांना त्यांनी परीधान केलेल्या दागिने हे व्यवस्थीत झाकलेले असावेत. शक्यतो मॉर्निंग वॉकला जातांना दागीने परिधान करु नयेत तसेच एकटे जाणे टाळावे.

कोणत्याही अनोळखी ईसमांसोबत बोलतांना आपल्या दागिन्यांची व पर्सची, मोबाईल फोनची काळजी घ्यावी. अनोळखी इसम पत्ता विचारण्याचे बहाण्याने जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्याचे पासुन सुरक्षीत अंतर ठेवावे अथवा त्याचे सोबत बोलणे टाळावे. काही अनोळखी इसम आपले जवळ येवुन कपडयांवर घाण पडली किंवा पत्ता विचारण्याचे बहाणा सांगुन आपले लक्ष विचलीत करण्याचा प्रयत्न करुन आपले जवळील रक्कम किंवा दागिन्यांची बॅग, मोबाईल पळवून नेण्याची शक्यता असते तरी आपण या बाबीची दक्षता घ्यावी.

आपली रकमेची बॅग, मोबाईल, फोन व्यवस्थीत सांभाळुन ठेवावे. आपले घरी आम्ही विशिष्ठ कंपनीचे लोक आहोत, सर्वे सुरु आहे किंवा, दागिने चमकवुन देतो असे सांगुन ईसमांना प्रवेश देवु नये असे ईसम हे फसवे असतात ते दागिने चमकवुन देण्याचे बहाण्याने आपले दागिने पसार होतात. असे ईसम आढळुन आल्यास तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा. आपणांस शक्य असल्यास आपले राहते घर, दुकान परीसरात सीसीटीव्ही कॅमेरा ची जोडणी करुन घ्यावी. शक्य असल्यास सोसायटी फ्लॅट या ठिकाणी रात्रीचे वेळी सुरक्षा रक्षकाची नेमणुक करावी आणि सदर सुरक्षा रक्षकाचे फोटो व आधारकार्ड संबंधीत पोलीस स्टेशन येथे सादर करावे. आपले परीसरात कोणतीही संशयीत व्यक्ती, वस्तु, वाहन, घटना ई. आढळुन आल्यास त्या बाबतची माहिती तात्काळ पोलीस स्टेशनला द्यावी. कोणतेही व्यक्ती लसीकरण, रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदानकार्ड, पंतप्रधान आवास योजना अथवा कंपनी प्रतिनीधी बाबत सर्व्हे करीत असतील तर त्यांचे व्हेरीफिकेशन करावे तसेच कोणालाही घरात प्रवेश देवु नये शंका असल्यास पोलीसांना माहिती दयावी.

आपले परीसरात नविन फेरीवाले आल्यास त्यांना त्यांचे ओळखपत्र विचारावे त्यांचेकडे ओळखपत्र नसल्यास व संशयित वाटत असल्यास तात्काळ पोलीसांना माहिती देवुन त्यांचा फोटो आपले मोबाईल फोन मध्ये काढुन घ्यावा. वरील सुचनांचे जनतेने पालन करुन आपले व आपल्या मालमत्तेचे संरक्षण करावे, असे आवाहन टेंभुर्णी पोलीसांनी केले आहे.

### रोहित पवार यांचा शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

# ...भावी नेतृत्त्वाला मतदान -निलेश लंके







**कर्जत । जामखेड -** विधानसभा निवडणुकीमध्ये कर्जत-जामखेड मतदारसंघातील सुज्ञ नागरिक फक्त रोहित पवार यांना मतदान करणार नाहीत, तर राज्याच्या भावी नेतृत्वाला मतदान करणार आहेत, असे प्रतिपादन अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी कालच्या सभेत केले. आमदार रोहित पवार यांनी दमदार शक्तीप्रदर्शन करत स्वाभिमानी कर्जत-जामखेडकरांच्या साक्षीने काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांचे समर्थन केले आणि मतदारसंघाच्या विकासासाठी पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास दाखवला.

गेल्या २५ वर्षात भाजपच्या ताब्यात असलेला कर्जत जामखेड मतदारसंघ रोहित पवार यांनी गेल्या ५ वर्षापूर्वी भाजपच्या ताब्यातून हिसकावून घेतला आणि वर्षानुवर्षाचा विकासाचा अणुशेष भरून काढत मतदारसंघात विकासाची भरारी घेतली आणि याच बळावर आता रोहित पवार यांचा विजय केवळ औपचारिकता असल्याचं दिसत आहे.

आमदार रोहित पवार यांनी मागच्या वेळेस कर्जत जामखेडमध्ये पिण्याची समस्या असताना स्वखर्चातून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला. कोणताही संबंध नसताना रोहित पवार यांनी पाणीपुरवठा केल्यामुळं लोकांनी त्यांच्या उमेदवारीची मागणी केली आणि पक्षानेही त्या मागणीची दाखल घेऊन त्यांना उमेदवारी दिली. उमेदवारी दिल्यानंतर रोहित पवार यांनी मोठ्या मताधिक्याने एका कॅबिनेट मंत्र्याला तब्बल ४५ हजार मतांनी धूळ चारली आणि कर्जत जामखेड मतदारसंघात त्यांनी दणदणीत विजय मिळवला. या दणदणीत विजयानंतर त्यांचा विकासरथ एवढा जोरात धावू लागला की गेल्या ५ वर्षात त्यांनी केलेली कामे बगीतली तर आजची निवडणूक ही रोहित पवार यांच्यासाठी केवळ औपचारिकता असल्याचे दिसत आहे.

आमदार झाल्यानंतर रोहित पवार यांनी कर्जत जामखेड मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली. मग मतदारसंघातून जाणारी राष्ट्रीय महामार्ग, गावागावातील रस्ते, पूल बांधले, अद्ययावत शासकीय इमारती, पंचायत समिती कार्यालये, तलाठी कार्यालये, सर्व सुविधायुक्त तीन उपजिल्हा रुग्णालय, शासकीय विश्रामगृह, डठ्ठझ्र केंद्र, डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांना राहण्याची उत्तम सोय केली.

आमदार रोहित पवार यांनी मतदारसंघाततील शेतकऱ्यांचा अडकलेला पीकविमा मंजूर करून आणला. मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे केली. सिंचनासाठी जास्तीत जास्त पाणी कसे आणता येईल याची काळजी घेतली. कधी नवे एवढा सीएसआर निधी मतदारसंघाच्या विकासासाठी खेचून आणला. जिल्हा परिषदेच्या तब्बल ४०० शाळा स्वखर्चातून डिजिटल केल्या. ज्या बँका अगोदर महिलांना कर्ज देण्यासाठी नकारघंटा देत होत्या. अशी परिस्थिती एकेकाळी होती. त्याच कर्जत जामखेड मतदारसंघात आता बँकांनी महिला बचत गटांना ३४ कोटी रुपये कर्ज दिले आहे आणि विशेष म्हणजे त्या कर्जाची परत फेड करण्याचे प्रमाण हे ९९ टक्के आहे. त्यामुळे महिला बचत गटांच्या माध्यमातून वेळेत कर्ज भरल्या जात असल्यामुळे त्या बचत गटांना सरकारकडून देण्यात येणाऱ्या व्याज सवलतीचाही फायदा होत आहे.

आमदार रोहित पवार यांनी आज जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला आणि यावेळी त्यांचा जोश आणि कर्जत जामखेड मतदारसंघातील वातावरण बघितलं तर आमदार रोहित पवार यांचा हा विजय केवळ औपचारिकताच असल्याचं सर्वसामान्य माणसांचे आणि राजकीय धुरीणांचे म्हणणे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष फुटल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी पक्ष संघटन वाढीसाठी राज्यभर दौरे केले. आता पुढील १५ दिवसात ते मतदारसंघातच प्रचार करतात की राज्यभर प्रचार करतात याबाबत सर्वसामान्य लोकांमध्ये उत्सुकता आहे. पक्षाचा एक प्रमुख चेहरा म्हणून त्यांचं नाव सध्या पुढे येत आहे , यावरून ते राज्यभर दौरे करतील आणि अशा परिस्थितीत लोकांकडूनच त्यांच्या प्रचाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली जात असल्याचं चित्र आता गेल्या दोन महिन्यांपासून पाहायला मिळत आहे.

कर्जत जामखेड मतदारसंघातील ह्या लढतीकडे जरी संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असले तरी या लढतीत आमदार रोहित पवार हे त्यांच्या विजयाचा झेंडा फडकविल्याशिवाय राहणार नाहीत अशीच चर्चा सर्वसामान्य लोकांमध्ये आहे.

### सतीश घाटगे यांचा घनसावंगीतून अपक्ष उमेदवारी दाखल; उसळला जनसागर

# बंडखोरी नसून जनतेसाठी उठाव - घाडगे

**घनसावंगी । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीत सतीश घाटगे यांनी विशाल असे शक्ती प्रदर्शन करत जनतेच्या मनातला उमेदवार म्हणून शेवटच्या दिवशी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी घनसावंगी विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील गावागावातून आणि खेड्या-पाड्यातून सर्वसामान्य जनता शेतकरी, कष्टकरी आणि युवक हजारोच्या संख्येने एकवटले होते. हजारो जनतेसमोर नतमस्तक होत , मी बंडखोरी केली नसून जनतेसाठी उठाव केला आहे. अशी भूमिका मांडत निवडणुकीतून माघार घेणार नसल्याचं स्पष्ट केलं.

माझी निवडणूक जनतेसाठी आहे. आणि जनता या लढाईत विजयी होणार.. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

घनसावंगी विधानसभेसाठी महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात जागेसाठी मोठी रस्सीखेच झाली. उमेदवारी अर्ज भरण्याच्या एक दिवस अगोदर घनसावंगी विधानसभेच्या जागेचा पेच सुटला. शिवसेना शिंदे गटाला ही जागा सुटली. मंगळवारी हिकमत उढान यांनी शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज भरला. तर सतीश घाटगे यांनी जनतेसाठी निवडणुकीच्या मैदानात उतरत असल्याची घोषणा करत हजारो जनसमुदायांच्या उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत अपक्ष उमेदवारी अर्ज केला. दरम्यान महायुतीचे तिकीट शिंदे गटाला मिळाल्यानंतर २८ ऑक्टोबर रोजी रात्रीच सोशल मीडियावर त्यांनी अधिकृतपणे भारतीय जनता पार्टीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला त्यानंतर मंगळवारी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.





**अंबड आणि घनसावंगीला दिला शब्द**

घनसावंगी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या अंबड जालना आणि घनसावंगीतील दुष्काळी गावांसाठी अतिशय महत्त्वाचा असलेला शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सतीश घाडगे यांनी लिफ्ट इरिगेशन प्रोजेक्ट जनतेसमोर मांडला या तिन्ही तालुक्यासाठी त्यांच्या संकल्पनेतून साकार झालेले हे लिफ्ट इरिगेशन प्रोजेक्ट निवडून आल्यावर पूर्ण करणार असा शब्द नामांकन सभेत सतीश घाटगे यांनी जनतेला दिला.

**सतीश घाटगे यांनी पुन्हा मोडला गर्दीचा रेकॉर्ड**

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी मोठे शक्ती प्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला. प्रमुख पक्ष्यांच्या उमेदवाराला देखील एवढा प्रतिसाद मिळाला नाही, तेवढा प्रतिसाद सतीश घाटगे यांना सर्वसामान्य जनतेचा मिळाला. नामांकन सभा व रॅलीसाठी घनसावंगी विधानसभा मतदारसंघातून जवळपास २५ ते ३० हजार जनसंख्या उपस्थित होती. भारतीय जनता पार्टीचे बोटावर मोजण्याइतके पदाधिकारी सोडता सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी सतीश घाटगे यांच्यासोबत खंबीर उभे असल्याचे या सभेत दिसले.

## चाय पे चर्चा विथ डॉक्टर्स, फार्मसिस्ट व पॅरामेडिकल (लॅब) असोसिएशन बैठक संपन्न





**परतूर । प्रतिनिधी -** परतूर मंठा नेर सेवली विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रचारार्थ परतुर शहरातील डॉक्टर्स, फार्मसिस्ट व पॅरामेडिकल (लॅब) असोसिएशन यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महायुतीचे उमेदवार माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर यांनी परतूर मंठा नेर सेवली मतदारसंघात त्यांच्या कार्यकाळात आरोग्य व अन्य क्षेत्रांत झालेल्या उल्लेखनीय कार्याची माहिती दिली. तसेच डॉक्टरांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन देऊन सर्व डॉक्टर्स, फार्मसिस्ट व लॅब असोसिएशन यांच्या सुरक्षिततेसाठी नेहमीच कटीबद्ध राहणार असल्याचे सांगीतले व विकासाला चालना देण्यासाठी विकास, राज्य आणि देशहित समोर ठेवून जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन केले.

ह्या बैठकीचे प्रास्ताविक परतूर डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ प्रमोद आकात यांनी तर सूत्र संचालन परतूर आयएमए सचिव डॉ स्वप्नील बी. मंत्री यांनी केले. यावेळी परतूर डॉक्टर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ जी. एम. बांगड़, डॉ डी. आर. नवल, डॉ पी. के. अंभुरे, परतूर भाजपा शहर अध्यक्ष प्रवीन सातोनकर, लॅब असोसिएशन अध्यक्ष श्री अशोक शेळके, फार्मसी असोसिएशन अध्यक्ष दत्ता गिरी, डॉ बी. आर. मंत्री, डॉ संदीप चव्हाण, डॉ प्रफुल्ल गट्टानी, डॉ दिपक कंदोई, डॉ प्रदीप सातोनकर, डॉ सुरुषे, डॉ घुले, डॉ कल्पेश मुंदडा, सुरेश मंत्री, उद्धव निर्वळ, अजीत पोरवाल, राम राठोड, गोविंद मालपाणी, अनिल तेलगड, माऊली भापकर, गजू काकडे, दत्ता सोळंके, मुजमील सय्यद, अतुल पोरवाल, प्रशांत डोम, इम्रान शेख, रमेश खांडेभराड उपस्थीत होते.डॉ सुधीर आंबेकर यांनी उपस्थीत सर्वांचे आभार मानले..

# फेक नारेटिव्हला बळी पडू नका; विकासाभिमुख लोणीकरांना विजयी करा

## वने व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन; परतुरात लोणीकर यांचा अर्ज भरण्यासाठी विराट जनसमुदाय उसळला





# लाडकी बहीण योजना बंद करण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांची हायकोर्टात याचिका - लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** महाविकास आघाडीच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीदरम्यान अनेक खोट्या नाट्य गोष्टी सांगून देशात सह महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल केली व त्या माध्यमातून लोकसभेला अनेक ठिकाणी महायुतीच्या उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला त्यामध्ये भाजपा सत्तेत आली तर आरक्षण संपवून टाकेल आणि राज्यघटना बदलून टाकतील अशा चुकीच्या गोष्टी प्रामुख्याने सांगण्यात आल्या परंतु त्यांचे नेते देशाबाहेर गेल्यानंतर आम्ही सत्तेत आलो तर आरक्षण संपवू असं बोलतात त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते खोट्या गोष्टींचा अपप्रचार करतील त्यांना बळी न पडता परतुर विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करणाऱ्या माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन राज्याचे वन व सांस्कृतिक आणि मत्स्य व्यवसाय मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज केले

परतुर येथे आज आमदार बबनराव लोणीकर यांच्या नामांकन अर्ज भरण्यानिमित्त आयोजित महा विराट रॅली च्या समारोपप्रसंगी श्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते यावेळी मंचावर भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस रिपाई आठवले गट रयत क्रांती संघटना व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार श्री बबनराव लोणीकर माजी आमदार श्री विलासराव खरात भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री राहुल लोणीकर आयुष्यमान भारत योजनेचे महाराष्ट्र राज्य प्रमुख श्री ओमप्रकाश शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी पुढे बोलताना श्री मुनगंटीवार म्हणाले की कुठल्याही परिस्थितीत कोणताही व्यक्ती देशाची राज्यघटना बदलू शकत नाही परंतु ज्या लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेला राज्यघटनेतील विचारांची पायमल्ली केली तेच लोक आज भारतीय जनता पक्ष आणि महायुतीवर राज्यघटना बदलणार असल्याचा आरोप करत आहेत त्यांना तोडीस तोड उत्तर देत त्यांनी पसरविलेले फेकणारे ठेव हाणून पाडण्याची जबाबदारी प्रत्येक महायुतीच्या कार्यकर्त्यावर असल्याचे देखील यावेळी मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले

देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत आज जगातील महत्त्वाच्या व निर्णय प्रक्रियेतील राष्ट्र बनले आहे संपूर्ण जगाला दिशा देण्याचे काम मोदीजींच्या नेतृत्वात भारत करत आहे अशा परिस्थितीत देशाला अधिकाधिक प्रगतिशील बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करण्यासाठी महाराष्ट्र देखील भाजपा महायुतीचे सरकार असणे आवश्यक आहे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने प्रयत्न करत असून आपणही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा नेता निवडणे आवश्यक आहे असे यावेळी मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले पुढे बोलताना मुनगंटीवार म्हणाले की बबनराव लोणीकरांच्या माध्यमातून कर्तबगार मंत्री आणि मग मागील पंचवार्षिक मध्ये अनुभवला असून यापुढे देखील पुन्हा एकदा केवळ आमदार नव्हे तर मंत्री निवडून देण्याची संधी तुम्हा सर्वांना आहे अशा शब्दात बबनराव लोणीकर पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रिमंडळात आपल्याला दिसतील असे सुतवाज यावेळी मुनगंटीवार यांनी दिले

आज परतुर शहरात माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पंढरपूरची यात्रा भरावी असा जनसमुदाय उसळला होता २० हजार पेक्षा अधिक बंधू भगिनींनी आज लोणीकरांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रॅलीमध्ये सहभाग नोंदवला यामध्ये ज्येष्ठ नागरिक महिला भगिनींसह युवा बांधवांचा जल्लोष बघण्यासारखा होता ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतिषबाजी हाती विराट शक्ती प्रदर्शन करत आज आमदार बबनराव लोणीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी युवा कार्यकर्ते व महिलांच्या घोषणांनी परतुर शहर दणाणून गेले होते प्रसंगी बबनराव लोणीकर पुन्हा एकदा प्रचंड मताधिक्याने निवडून येतील असा विश्वास रॅलीमध्ये सहभागी असलेल्या नागरिकांनी व्यक्त केला

परतु विधानसभा मतदारसंघात महिला बचत गटाच्या माध्यमातून १ लाख १० हजार ७२० लाभार्थी महिलांना अर्थशाही उपलब्ध करून देण्यात आले असून त्या माध्यमातून महिलांनी वेगवेगळे व्यवसाय करत खंबीरपणे आपल्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न केला आहे त्यासाठी वारंवार बैठका घेऊन महिला बचत गटांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी सातत्याने प्रयत्न केले होते त्या माध्यमातून बचत गटाच्या महिलांच्या खात्यात ८० कोटी ४ लाख रुपयांचा निधी जमा झाला असल्याची माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या **पान २ वर**

## काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष अब्दुल हफीज यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल



**जालना । प्रतिनिधी -** काँग्रेस (आय) पक्षाचे माजी शहराध्यक्ष आणि सक्रिय पदाधिकारी अब्दुल हफीज यांनी आज मंगळवारी (दि.२९) अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी त्यांच्यासमवेत ऑल इंडिया मुस्लिम - ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी, माजी नगरसेवक अहमद बीन सईद चाऊस, ज्येष्ठ पत्रकार विनायकराव दहातोंडे, सुबोधकुमार जाधव यांची उपस्थिती होती. तसेच समर्थक शेख अब्दुल गनी, अब्दुल मुखीद, परवेज खान, नविद खान, जब्बार खान, आदिल सिद्दीकी, अझहर पठाण, अब्दुल मोईद, अब्दुल कय्युम, अब्दुल हसिब, शेख मुशिर, शेख नजीर, शेख रियाज, इकबाल शेख, शेख एराज, शेख शरीफ, शेख अरबाज, शेख शाकेर, शेख साहिल, अब्दुल सलाम, फेरोज बागवान, समीर खान, अरीफ खान, साजेद खान, शाहेद खान, बिलाल शेख, शेख साकेब, शेख मज्जू, शेख जम्मु, अदनान खान, मुफ्फसीर कुरेशी, मुज्जमील शेख, मिजाद शेख,शेख मोहसीन, बबलु रज्जाक तालेब, खान जैद, इमरान शेख, जाहेद खान, राहील शेख, अल्तमश शेख, रफीक शेख, शेख शाहरुख, इम्तियाज रज्जाक तालेब, शेख कलीम यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



**भाजपचे महानगर शहर अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी मंगळवार (दि २९) रोजी जालना विधानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवारी दाखल केली (छाया अनिल व्यवहारे)**

# पुन्हा एकदा मानवतेचा मेळावा!

## ७७ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची तयारी

**जालना । प्रतिनिधी -** सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या अपार कृपेने दरवर्षी प्रमाणे निरंकारी परिवाराचा ७७ वा वार्षिक संत समागम १६, १७ व १८ नोव्हेंबर २०२४ रोजी संत निरंकारी अध्यात्मिक स्थळ, सामलखा येथे संपन्न होणार आहे. अध्यात्माचा आधार घेऊन प्रेम, शांती आणि एकतेचा संदेश या मेळाव्यात दिला जातो, जो निःसंशय मानवतेच्या कल्याणाचा आहे. या संत मेळाव्याची भव्यता केवळ त्याच्या परिसरावरूनच अधोरेखित होत नाही, तर देश-विदेशातून येथे येणार्या लाखो भाविकांच्या भावनेतूनही ते सूचित होते, हे सर्वश्रुत आहे. निरंकारी संत समागम हा मानवतेचा असा दैवी संगम आहे जिथे प्रत्येकजण धर्म, जात, भाषा, प्रदेश, संपत्ती आणि गरिबी इत्यादींच्या अडथळ्यांच्या वर उठून प्रेम आणि समरसतेने सेवा, स्मरण आणि सत्संग करतो. सर्व संत, पीर आणि गुरूंनी वेळोवेळी दिलेला हाच संदेश आहे. या तीन दिवसीय संत समागमात भाविक भक्तीच्या विविध पैलूंवर गीते, विचार, कविता आदींद्वारे आपल्या शुभ भावना व्यक्त करतील. सर्वांना सतगुरु माता जी आणि निरंकारी राजपिता जी यांच्या प्रवचनाची अनमोल भेटही मिळेल. या वर्षी सतगुरु माताजींनी मेळाव्याची थीम दिली आहे - 'विस्तार, अमर्यादकडे'.

विशाल निरंकारी संत समागम प्रभावीपणे आणि सुरळीतपणे आयोजित करण्यासाठी निरंकारी मिशनचे भक्त आणि सेवक देशाच्या कानाकोपर्यातून महिनोनमहिने अगोदर येतात आणि आपली निस्वार्थ सेवा अर्पण करून तयारी सुरू करतात. सामुदायिक सेवांचे हे दृश्य स्वतःच खूप प्रेरणादायी आणि मनमोहक आहे. या वर्षी



देखील असे दिसून आले की सेवा पहाटेपासूनच सुरू होते जिथे प्रत्येक वयोगटातील स्त्री-पुरुष विविध प्रकारच्या सेवा देत आहेत. सेवकांच्या हातात मातीची भांडी आणि त्यांच्या जिभेवर भक्तीची गोड गाणी. काही ठिकाणी जमिनीचे सपाटीकरण तर काही ठिकाणी तंबू उभारले जात आहेत. सेवादल गणवेशातही तरुण बंधू-भगिनी आपल्या अधिकार्यांच्या सूचनेनुसार मैदानावर विविध प्रकारच्या सेवांमध्ये व्यस्त आहेत. लंगर, कॅन्टीन, प्रकाशने अशा अनेक सुविधा सुरळीत सुरू आहेत, ज्या येत्या काळात आणखी मोठ्या होणार आहेत. जी सामाजिक क्रिया दिसते त्याला पूर्णपणे आध्यात्मिक आधार असतो. एकमेकांमधील भगवंताचे रूप पाहून सर्वजण 'धन निरंकार जी' म्हणत एकमेकांच्या पाया पडत आहेत. हे 'विद्या ददाति विनयम्' चे जिवंत उदाहरण वाटते. प्रत्येकाच्या चेहर्यावर एक आध्यात्मिक आभा आहे, जो त्यांच्या अंतःकरणातील विश्वास आणि समाधान प्रकट करत आहे. सेवा करणार्या या भक्तांच्या आनंदाची आणि आनंदाची शिखरे त्यांना सेवा करताना सतगुरूंचे दर्शन घेताना दिसून येते. त्या क्षणी गुरशिखांची मने नाचू लागतात, गाऊ लागतात, नाचू लागतात. सर्व भाविक वर्षभर या स्वर्गीय दर्शनाची वाट पाहत असतात.

संत निरंकारी मंडळाचे सचिव व समागमाचे समन्वयक श्री जोगिंदर सुखीजा यांनी सांगितले की, सर्व संतांसाठी निवास, भोजन, स्वच्छतागृह, आरोग्य, सुरक्षा, आगमन-निर्गमन आणि इतर सर्व मूलभूत सेवांची तयारी सुरू आहे. राज्य प्रशासनाकडूनही सर्व प्रकारचे सहकार्य मिळत असून कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत सर्व कायदेशीर बाबी लक्षात घेऊन सर्व व्यवस्था करण्यात येत आहे. काही दिवसांत या अध्यात्मिक स्थळाला 'भक्तीनगरी'चे स्वरूप येईल, जिथे जगभरातील लाखो संत-महात्मे सहभागी होतील. मानवतेच्या या महान संगमात प्रत्येक धर्मप्रेमी बंधू-भगिनींचे स्वागत आहे.

## युवा आदर्श

### दिपावली...

स्वत: पलीकडेही
जग सुंदर असून
जातो आपण कसे
सहज हे विसरून
क्षण छान सुखाचे
बसतो का घालवून
कुरवाळतो अंधार
दिप स्वत: मालवून
कोषामध्ये आपल्या
कोळी जाई अडकून
क्षण भंगुर दु:खाला
घट्ट ठेवतो जखडून
पहावे जरा दुजांचे
आसवे हळूचं पुसून
दुसऱ्याच्या सुखाचे
स्वागत करा हसून
लाव एखादी पणती
शेजारी जरा जावून
आपलेचं अंगण ते
निघे प्रकाशी न्हावून
दिव्याची रांग सजता
तिमीर जाई पळून
सर्व सणाची राणी
दिवाळी ये उजळून

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

# आचारसंहिता कालावधीत जास्तीची रोख रक्कम बाळगल्यास जप्तीची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणुक- २०२४ ची आदर्श आचारसंहिता सर्वत्र लागू झाली आहे. तरी आचारसंहितेच्या काळात योग्य कागदपत्रांशिवाय ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम बाळगल्याच्या प्रकरणी निवडणूक फिरते पथक, स्थिर पथक रक्कम जप्त करण्याची कारवाई करेल. त्यानंतर जप्त केलेला निधी तातडीने सोडण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जिल्हा तक्रार समिती स्थापन करण्यात आली असून या समितीकडून नियमानूसार कारवाई करण्यात येईल. अशी माहिती नोडल अधिकारी (खर्च), जालना यांनी दिली आहे. जिल्हा तक्रार समिती या समितीचे अध्यक्षपद जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असेल. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा कोषागार अधिकारी तसेच, आयकर विभाग उपायुक्त हे समितीचे सदस्य आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी, निवडणूक खर्च संनियंत्रण समिती (संयोजक) यांचा मो.क्र.७८७५२००३९३ असा असून जप्त केलेली रक्कम सोडण्याची मागणी करणाऱ्या व्यक्तींनी संयोजकांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून **पान २ वर**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.